मुंबई मध्यवर्ती कारागृह (आर्थररोड कारागृह) येथे सुरक्षा व्यवस्थेत सुधारणा सुचविण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक : जेएलएम-१२१५/प्र.क्र.१००/तुरुंग-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :-०४ डिसेंबर, २०१७.

<u>वाचा</u> :- (१) गृह विभाग अधिसूचना समक्रमांक,दि.२८ मे,२०१५
(२) नगर विकास विभाग, आदेश क्र. टीपीबी ४३१५/१४६/प्र.क्र.११३/२०१५/नवि-११ दि. ६ ऑगस्ट,२०१५

प्रस्तावना :-

मुंबई मध्यवर्ती कारागृह (आर्थररोड कारागृह) कारागृहाच्या आजूबाजूला मोठया प्रमाणात झोपडपट्टी असून जवळच मोनोरेलचे स्थानक झाले आहे, त्यामुळे त्या ठिकाणी विकास होत आहे. यास्तव सदर कारागृहाची पूर्ण व्यवस्था जेसे की, प्रकाश व्यवस्था, भिंतीची उंची, गार्डची नियुक्ती, कारागृह लगतचा होत असलेला विकास या सर्व बाबीचा सर्वकष विचार करुन आवश्यक असल्यास सुरक्षेव्यवस्थेत सुधारणा सुचविण्यासाठी समितीची रचना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

त्यानुसार खालील प्रमाणे समिती गठित करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	नाव	पदनाम
१	सह पोलीस आयुक्त (का व सु), मुंबई	अध्यक्ष
२	विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) दक्षिण विभाग,मुंबई.	सदस्य
३	सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.	सदस्य

सदर समितीने आपला अहवाल १ महिन्यात शासनास सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१७१२०४१५४७१८५२२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sandip Shamrao Kamble

Digitally signed by Sandip Shamrao Kamble
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d7be2b5d92ced254370f6b4a45426167ed60f51dcb34812d7d246c9a9c8557c, cn=Sandip Shamrao Kamble
Date: 2017.12.04 15:53:02 +05'30'

(संदिप कांबळे)
शासनाचे अवर सचिव

प्रत,

१) मा .मुख्य मंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय मुंबई -३२
२) मा. राज्यमंत्री (गृह शहरे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई -३२
३) अ.मु.स (गृह),मंत्रालय,मुंबई-३२.
४) प्रधान सचिव (अ व सु), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
५) प्रधान सचिव (नगर विकास विभाग-नवि-१),मंत्रालय,मुंबई ३२.
६) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
७) पोलीस आयुक्त,मुंबई.
८) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
९) निवडनस्ती-तुरुंग-२.